# उत्तर विभाग सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, गु.अ.विभाग, समतानगर, कांदिवली (पुर्व) मुंबई-४००१०१

## प्रेसनोट

### फेसबुक या सोशल मिडीया साईट मार्फत मैत्री करून वेगवेगळी कारणे सांगुन फसवणुक करणाऱ्या टोळीला सायबर गुन्हे शाखेकडून अटक

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | उत्तर विभाग सायबर पोलीस ठाणे, मुंबई. |
| २ | गु.र.क्र व कलम. | ७०/२०२१ कलम ४१९, ४२०, ५०६, ३४ भादवि सह कलम ६६(क)(डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम |
| ३ | गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिनांक १८/०४/२०२१ ते दि. २१/०९/२०२१ रोजीच्या दरम्यान. |
| ४ | आरोपी अटक | १) राणी पंकज सारंग वय ४२ वर्षे<br>२) रूचीका गणेश हातीपकर वय २४ वर्षे<br>३) प्रदाद दिपक भानुशाली वय २७ वर्षे |
| ५ | फसवणूक केलेली मालमत्ता | रोख रक्कम रूपये १,११,७९,६२२/- ( एक कोटी अकरा लक्ष एकोणऐंशी हजार सहाशे बाविस रूपये ) |
| ६ | हस्तगत मालमत्ता | १) बँक खात्यात गोठविण्यात आलेली रक्कम १७,००,०००/- रूपये,<br>२) फसवणुकीच्या पैशातुन खरेदी केलेले रोख २२,००,०००/- रक्कमेचे सोन्याचे दागिने,<br>३) वेगवेगळया बँक खात्याचे चेकबुक, पासबुक, एटीएम कार्ड |
| ७ | तपासी अधिकारी | पोलीस उप निरीक्षक तेजश्री यादव<br>पोलीस निरीक्षक मंगेश देसाई |

यातील तक्रारदार यांना राणी सारंग नावाच्या महिलेने फेसबुक या सोशल मिडीयाचे माध्यमातुन फसवणुक करण्याचे हेतुने तक्रारदार हे १७ वर्षापुर्वी काम करत असलेल्या बजाज इलेक्ट्रीक्ल्स कंपनीमध्ये काम करणारे इसम विलास सारंग हे तिचे पती असल्याचे भासवण्याकरीता बनावट फेसबुक प्रोफाईल बनवुन फेंड रिक्वेस्ट पाठवुन तसेच फेसबुक मॅसेंजरवरून व वॉटसुअप मॅसेज करून तक्रारदार यांना दिनांक १८/०४/२०२१ ते २१/०९/२०२१ या दरम्यान राणी स्वत: व तिची मुलं आजारी असुन वेगवेगळी कारणे सांगुन आर्थिक अडचण असल्याचे खोटे मॅसेज करून तसेच महिला नामे सरस्वती व तिचा पती प्रकाश हातीपकर, रूचिका, सुरभी, प्रसाद भानुशाली, संतोष मामा, सतिश, कदम यांनी आपसात संगनमत करून तसेच राणी हिने ती स्वत: मेल्याचे खोटे नाटक करून तसेच सरस्वती हिने तक्रारदार यांनी तिला पैसे नाही दिले तर आत्महत्या करणार असल्याची धमकी देवुन सर्वांनी मिळुन तक्रारदार यांचेकडुन १,११,७९,६२२/- रूपये उकळुन तक्रारदार यांची फसवणुक केली . त्यामुळे त्यांनी उत्तर विभाग सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, गु.अ.विभाग, मुंबई येथे दिलेल्या तक्रारीवरून वर नमुद गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयात तांत्रिक व कौशल्यपुर्वक केलेल्या तपासात व प्राप्त माहितीच्या विश्लेषणातुन उत्तर विभाग सायबर पोलीस ठाणे, मुंबई यांनी सापळा रचुन महिला आरोपी नामे राणी पंकज सारंग, रूचीका गणेश हातीपकर व प्रसाद दिपक भानुशाली यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली. तक्रारदार यांनी आरोपीतांच्या बँक खात्यावर पैसे पाठविले होते, त्यापैकी त्यांच्या बँक खात्यावर रक्कम रूपये १७,००,०००/- फ्रिज करण्यात आली असुन

आरोपीतांनी तक्रारदार यांच्या पैशातुन अंदाजे रूपये २२,००,०००/- किंमतीचे सोन्याचे दागिने खरेदी केले होते, ते हस्तगत करण्यात आले आहे. तसेच वेगवेगळया बॅकाचे पासबुक, चेकबुक हस्तगत करण्यात आले आहे.

उत्तर विभाग सायबर पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून जनतेस आवाहन करण्यात येते की, सोशल मिडीयावर प्रसारित होणाऱ्या कोणत्याही संदेशाबाबत जागरुकतेने व खात्री करुन प्रतिसाद दयावा. आपली अश्याप्रकारे फसवणुक झाली असल्यास किंवा आपणास अशाप्रकारची माहीती प्राप्त झाल्यास त्याची माहिती तात्काळ स्थानिक पोलीस ठाणे अथवा सायबर पोलीस ठाणे यांना दयावी.

सदरची प्रभावी कामगिरी पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. मिलींद भारंबे, मा. अप्पर पोलीस आयुक्त ( गुन्हे) श्री. एस.विरेश प्रभु, मा. पोलीस उप आयुक्त डॉ.रश्मी करंदीकर, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. नितीन जाधव, व प्रभारी व.पो.नि.श्रीमती सरला वसावे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. मंगेश देसाई, पोउनि तेजश्री यादव, पोउनि संदिप शेवाळे, म.पो.शि.०४.७४३/जाधव, पो.शि./सुर्यवंशी, पो.शि. ११.०५५३/ तांबोळी, पो.शि. १३.०३१५/चव्हाण यांनी यशस्वीपणे पार पाडली.